# कोरोनाचे उपकार

जगांतल्या बलाढ्य देशांच्या सत्ताधीशांपासून ते आशिया खंडातील सर्वांत मोठ्या झोपडपट्टीत - धारावीत - रुतलेल्या गरीब श्रमिकांपर्यंत सर्वांना भेदरवून सोडणाऱ्या अत्यंत सूक्ष्म विषाणूचं कर्तृत्व पाहायलाच नव्हे तर अनुभवायला मिळणं ही काही छोटी गोष्ट नाहीं. मानवनिर्मित चळवळी किंवा दंगली असोत अथवा नैसर्गिक आपत्ती असोत, त्यांचा प्रकोप आणि शमन याचा एक ठराविक काळ असतो. पुन्हा आपलं सगळं मागल्या अंकावरून पुढे चालू राहतं. पण ह्या कोरोनोचं सगळंच आगळं वेगळं ! भल्या मोठ्यांची गणितं आणि हिशोब त्यानें चुकीचे ठरवले.

रस्त्यांवरची  माणसांची आणि वाहनांची गर्दी कमी झाल्याने शुद्ध आणि स्वछ हवेला हातपाय पसरायला जागा मिळाली हें कांहीं कमी नाहीं. हवेप्रमाणें पक्षी आणि कांहीं ठिकाणीं जनावरं देखील आपलं अस्तित्व सिद्ध करायला लागलीं.  निसर्गाला वावरायला आणि सावरायला संधी मिळाली आहे. एक बरं आहे इथें कोणी C.E.O. नाही. त्यामुळे तुमच्यावर पाळत नाही. हवा पण स्वच्छ झाल्यामुळे तसाही मोकळेपणानें श्वास घेतां येतो.

माझ्यासारख्या वैद्यकीय क्षेत्रांतील व्यक्तीला हा बदल अधिकच भावतो. माझ्या एका सहकाऱ्याने मला सांगितलं होतं कीं, त्यांच्या खासगी इस्पितळांत, तुम्ही रोग्यांशी काय आणि कसं बोलतां याची गुप्तपणें नोंद घेतली जाते आणि एखादी तपासणी किंवा उपचारपद्धती अमलांत आणावी किंवा नाही याबद्दल तुम्ही जर रोग्याशी अथवा त्यांच्या नातेवाईकांशी चर्चा केली तर तुम्हांला डच्चू मिळण्याशी शक्यता अधिक ! प्रत्येक तपासणीचे कांहीं निकष असतात आणि कोणती तपासणी एखाद्या रोगाच्या अनुषंगानें अधिक महत्वाची आहे किंवा काय हें ठरवणं, त्या तज्ञाच्या अनुभवाचा भाग असतो. सर्वांना सर्व तपासण्यांची गरज नसते. परंतु जिथें अशास्त्रीय व्यवस्थापन असते तिथें रोग्याला कसं वाटतंय त्या पेक्षां इस्पितळाची आवक कशी वाढेल हा विचार असतो. आणि जर त्या तज्ज्ञाने जर एखाद्या खर्चिक तपासणीची आवश्यकता नाहीं असं सांगितलं तर तुम्ही क्षमेला पात्र नाहीं. तुमची पात्रता, तुमच्या अधिक रोगी जमा करण्याच्या क्षमतेवर अवलंबून असते. रोगी बरे करण्याच्या क्षमतेवर नाहीं.

त्यामुळें बाहेरून बघणाऱ्याला आतां वैद्यकीय क्षेत्राला अच्छे दिवस आल्यासारखे भासतात. सार्वजनिक इस्पितळांची दशा आतातरी सुधारेल अशी आशा आहे. कारण तिथें आरोग्य आणि योग्य शिक्षण यांचा विचार केला जातो. आणि आतातरी कोरोनामुळें त्यांचं महत्व सत्ताधाऱ्यांना समजलं असावं अशी आशा आहे. ह्या कोरोनाच्या लढाईंत वैद्यकीय क्षेत्रांतील सर्वच जण आणि सार्वजनिक सुव्यवस्था राखणारे पोलिसदल ह्यांच्या योगदानाची दखल समाजाकडून घेतली जावी एवढी किमान

अपेक्षा मी बाळगते. नाहींतरी 'गरज सरो आणि वैद्य मरो' ही म्हण आपल्याला पूर्वापार ओळखीची आहे. पूर्वी म्हणी ह्या म्हणण्यासाठी असायच्या. आता कधीकधी प्रत्यक्षांत आणण्याचे प्रयत्न होताना दिसतात.

कोरोनानें फसवा डाव टाकला आहे. त्याच्या मनांत काय आहे याचा थांगपत्ता तो कोणाला लागू देत नाहीं त्यामुळें बऱ्याचशा वाचीवीरांची गोची होते. आम्ही हे केलं, ते केलं; असं करूं, तसं करूं असे सगळे मनसुबे दोन, तीन दिवसांत बदललेले आढळतात.

माझ्या एका सहकारिणीने पाठवलेल्या व्हॉटस अप निरोपातून प्रशासनाचा मानसिक गोंधळ लक्षांत यावा. हा संदेश खास करून कोरोनाविरहित रुग्णसेवेचं काय करायचं ह्याबाबत होता. दवाखाने आणि क्लिनिक्स चालू ठेवावी कीं नाहीं असा मोठा गहन प्रश्न सोडवण्याचे प्रयत्न होते ते ! त्याचा नमुना असा :

राज्य सरकार : खोलो, मत बंद करो. कैंद्र सरकार : खोलो मत, बंद करो

स्थानीय प्रशासन : मत खोलो, मत बंद करो.

रोगी म्हणतो / म्हणते : मी आल्यावर उघडा , नाहीतर नको.

असोशिएशन म्हणते : वाटलं तर उघडा, नाही वाटलं तर नका उघडू. तुमची बुद्धी ( अक्कल ) वापरा .

माझं हृदय सांगतं : नको बंद करूं. माझा मेंदू म्हणतो : उघडूं नको.

तर सारासार विचार असा आहे : कधी उघडा, कधी बंद करा.

आतां सांगा काय करायचं ?

मानवनिर्मित जात-पात, भाषा ,धर्म, इतिहास. रूढी, परंपरा वगैरे अनेक बाबतीतला फोलपणा ह्या कोरोनाने प्रकर्षाने उजागर केला त्या बद्दल त्याचे आभार मानायला हवेत; परंतु ते समजण्याची क्षमता आणि मानण्याची मानसिक तयारी असणं आवश्यक आहे. विशेषतः समाजातील "आहे रे" घटकांना ! "नाहीं रे" घटकांपाशी आधीच होतं तें अपुरं होतं आणि आतां तर होत्याचं नव्हतं झालंय.

मला वाटतं दारिद्र्य, अज्ञान आणि त्यामुळे केली गेलेली पिळवणूक ह्यामुळे झालेली जीवित्तहानी कोरोनाच्या छळणूकीपेक्षा कित्येक पटींनी भयानक आणि भेसूर आहे. घरांत बसून टीव्हीवरची दृश्यं पाहतांना आपण माणूस असल्याची लाज वाटते आणि आपण काहींच करू शकत नाहीं याची हताशा जाणवते.

कधीतरी ग्रीक मायथॉलॉजीच्या एका पुस्तकांत एक गोष्ट वाचली होती. पेंडोरा नांवाची एक पोरसवदा मुलगी, तिच्याकडे ठेवायला दिलेलं महत्वाचं बॉक्स स्त्रीसुलभ स्वभावानुसार उघडते आणि त्यांतून जगांतील सर्व वाईट गोष्टी, चोरी, लबाडी, खोटेपणा, दंभ, अनैतिकता वगैरे बाहेर पडतात आणि जगभर पसरतात. पण सर्वांत शेवटीं एक इवलसं पाखरूं त्यांतून बाहेर ओरडत येतं "मी आशा आहे, मी आशा आहे". आपण सर्व जण त्या चिमण्या पाखराची वाट पाहूया.

कोरोनाचा आणखी एक फायदा! सर्वत्र टाळेबंदी असल्यानें आपल्या विस्मृतीची कुलुपं उघडली जाऊन भूतकाळाच्या असंख्य घटना संथपणे चघळून रवंथ करतां येतात. आणि आपल्या स्वप्नांचा आणि अनुभवलेल्या सत्याचा मागोवा घेतांना एक वेगळीच अनुभूती येते.

सध्याच्या परिस्थितीतून कोरोना-साहित्याची मोठी निर्मिती होण्याची शक्यता नाकारतां येत नाही. फक्त वैद्यकीय शास्त्रांतच नाही तर अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, पत्रकारिता वगैरे अनेक विषयांत ह्या विषयावर प्रबंध लिहिण्याची आणि पी.एच. डी. मिळवण्यासाठी आतापासूनच अनेक जण जागतिक स्तरावर तयारी करत असतील. न जाणो त्यातून नोबेल पारितोषिक सुद्धा मिळू शकेल कोणाला !

मला मात्र त्यानें हा लेख लिहायची संधी दिली म्हणून त्याचे आभार !

**डॉ. मालिनी नाडकर्णी**